| | | |
|---|---|---|
| MHKO050027192023 | **म.सं.कौ.हि. का.अर्ज क्र. ७०/२०२२ निशाणी ६५ खालील आदेश** | **लता अमर शेटे<br>वि.<br>अमर प्रभाकर शेटे** |

**१.** अर्जदार हिने सदरचा अर्ज वि.प.क्र.१ यांनी पोटगीची रक्कम रू.२,१०,५००/- जमा न केल्यामुळे त्यास तुरूंगात ठेवण्याचा हुकूम होण्याकरिता दाखल केला आहे. अर्जदार हिचे असे कथन आहे की, वि.प.क्र.१ यांनी २३ महिन्यांची पोटगी अदा केलेली नाही. वि.प. यांनी केवळ रू.१०,५००/- वेळोवेळी अदा केलेली आहे आणि वि.प.क्र.१ यांच्याकडे एकूण रू.२,१०,५००/- एवढी पोटगीची रक्कम थकित आहे. शेवटी, अर्जदार यांनी विनंती केली की, पोटगीची रक्कम रू.२,१०,५००/- वसुलीकरिता वि.प.क्र.१ याच्याविरूध्द अटक अधिपत्र जारी करावे.

**२.** वि.प. यांच्या विधिज्ञांनी नि.६६कडे अर्ज देवून म्हणणे दाखल केले. वि.प.क्र.१ यांचे असे कथन आहे की, अर्जदार ही अंतरिम पोटगी आदेशाचा विपर्यास करून अर्जदार यांनी मासिक रक्कम रू.३,०००/- प्रत्येकी अर्जदार क्र.१ ते ३ असे एकूण रक्कम रू.९,०००/- गृहित धरून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज चुकीचा विपर्यास करून चुकीचे हिशोब करून दाखल केला असल्यामुळे तो नामंजूर करावा अशी विनंती केली.

**३.** अर्जदार यांच्या विधिज्ञांनी नि.६८कडे त्यांचा लेखी युक्तिवाद दाखल केला. वि.प.क्र.१ व त्यांचे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. वि.प.क्र.१ यांना ही बाब मान्य आहे की, त्यांनी आतापर्यंत एकूण फक्त रू.१०,५००/- रक्कम पोटगी करिता अर्जदार हिला दिलेली आहे. अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसून येते की, अंतरिम पोटगीचा आदेश दि.३१/१०/२०२३ रोजी पारीत करून माझ्या पुर्वीच्या पिठासीन अधिकारी यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रतिमहा अनुक्रमे रक्कम रू.३,०००/- मंजूर केलेली आहे. वि.प.क्र.१ यांच्या कथनाप्रमाणे अर्जदार यांनी अंतरिम पोटगी आदेशाचा

विपर्यास करून अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी रू.३,०००/– दरमहा असे समजून दरमहा रू.९०००/– प्रमाणे चुकीची आकारणी करून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. नि.१२कडे दि.३१/१०/२०२३ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माझ्या पुर्वीच्या पिठासीन अधिकारी यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना अनुक्रमे दरमहा रू.३,०००/– अंतरिम पोटगी मंजूर केलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांनी चुकीची आकारणी करून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला हे वि.प. यांचे कथन योग्य व बरोबर नाही. वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांना नियमितपणे पोटगीची रक्कम दिलेली नाही असे दिसून येते. वि.प. हा प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये हजरही राहत नाही. यावरून ही बाब स्पष्ट होते की, वि.प.हे अर्जदार यांना अंतरिम पोटगीची रक्कम देण्यास टाळाटाळ करीत आहेत. वरील विवेचनार्थी मी या निष्कर्षापर्यंत पोहचलो आहे की, वि.प.क्र.१ यांना अटक अधिपत्र जारी केल्याशिवाय वि.प.क्र.१ हा थकलेली पोटगीची रक्कम रू.२,१०,५००/– जमा करू शकत नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पोटगीची रक्कम रू.२,१०,५००/– वसुल करण्याकरिता वि.प. क्र.१ यांना अटक अधिपत्र जारी करावे.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2025.02.11 16:37:44 +0530

**दिनांक– ११/०२/२०२५**
**इचलकरंजी**

**(संजय दि. वानखेडे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं. ३,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**